मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

१०३८९

२१।३।७१

सार्वजनिक गणेशोत्सव, ठाणे.

कुमार किरण सिताराम प्रधान यांस/हीस

वक्तृत्वाच्या — ~~[illegible]~~ — स्पर्धेतील यशाबद्दल

दुसऱ्या क्रमांकाचे/उत्तेजनार्थ पारितोषिक.

दिनांक १-९-१९६३

द. ना. पाळकर
अध्यक्ष

३४३८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ७१४५८ वि. बा. बा.
क्र. ३४३८ नों. दि. २१।३।७०

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. १०३५९ नों. दि.
वि. बा. बा.

अनुक्र. ७१७५८ दि ...
क्रमांक ३०४०७ ... नोंद दि. 29/3/...

स्वदेश-परिचय माला

# किती सुंदर देश आपला



भगवतशरण उपाध्याय

भाषांतर :
प्रभाकर माचवे

राजपाल अँड सन्स, दिल्ली-६

मूल्य
एक रुपया पचवीस नवे पैसे

●

प्रथम आवृत्ति
मार्च, १९६३

●

प्रकाशक
राजपाल अँड सन्स
काश्मीरी गेट, दिल्ली - ६

●

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
कर्नाटक हाउस
चिराबाजार, मुंबई २

# किती सुंदर देश आपला

०

किती सुंदर आहे आपला हा देश, हा भारत! जसे आभाळात असंख्य चमचमणाऱ्या चांदण्यांत चंद्र-सूर्य आगळे, तसाच त्रिखंड पृथ्वीत न्यारा आपला हा देश. निसर्गाने आपल्या हातांनी याचे संगोपन केले; आणि आई सुंदर मुलाला जन्म देऊन जशी समाधान पावते, निसर्गही या देशाला जोपासून प्रसन्न झाला.

तिन्ही बाजूला हेलकावणारा समुद्र, पूर्व, पश्चिम, दक्षिण दिशात शंख, शिंपलीं व मोत्यें विखुरणारा, उत्तरेकडे गिरिराज हिमालय. निळ्या आकाशाखाली निळा समुद्र, ज्याला आदि ना अंत, अनन्त परमेश्वर.

खाली निळा समुद्र मनोहर वरती निळे गगन हे
ढगांवरी बसुनी विहरावे हेच इच्छिते मन हे।

यामुळेच देवतादेखील गातात की धन्य ही भारतभूमी, धन्य हा देश, स्वर्गाहूनही सुंदर! धन्य तेथे जन्म लाभलेली माणसं. जन्म घ्यावा तर भारतातच.

आणि याच भारताच्या सुवर्णभूमीवर शेंकडो तऱ्हेची माणसं वसताहेत—काळी, गोरी, गव्हाळ कांतीची, उंच, ठेंगू, मध्यम उंचीची. येथील माणसं, बाहेरून आलेली माणसं. पण जे आले ते येथेंच रमले.



ज्याला येथील मातीचा स्वाद मिळाला, तो मग कोठे जाणार ? मोठ्या पुण्यफलाने त्याला या:जमिनीचा स्पर्श लाभला होता, हिच्याच मातीत तो खेळला, यांतच त्याची माती मातींत मिळाली.

सोने प्रसवणारी माती, काळी, करडी, पिवळी; नद्यांच्या दुधाने न्हालेली. जमिनीच्या एकेका तुकड्यावर कोट्यवधी प्राणी. असे प्राणी जे एकामेकाहून आकारा-प्रकारात वेगळाले; ज्यांचे अन्न-वस्त्र वेगळे, आचार वेगळे. पण सगळ्यांची मनं एक. या जमिनीच्या

तुकड्यावर कोट्यवधी स्त्री-पुरुष वसतात, पण ते या भूमीला एकसारखेच प्यार आहेत, ते एक-मन, एक-प्राण आहेत.

लोकांच्या भाषा भिन्न, राहणी भिन्न, रीतरिवाज भिन्न, पण त्यांचे आकाश एक, जमीन एक, हवा-पाणी एक. त्यांचे राज्य एक, राजनीति एक, समाज एक. सूर्य सारखाच त्यांच्यावर आपले सोने विखुरतो. चंद्र आपली चांदी.

मेघ अमृताचा वर्षाव करतात, वारे त्यांना सारखेच शिवतात. प्रकाशयुक्त दिवस, अंधाऱ्या रात्री त्यांच्या देशाची परिक्रमा करतात; सोनेरी सकाळ व रेशमी संध्याकाळी याच देशावर आपल्या ताण्या-बाण्याने मनोहर वस्त्र विणतात. आपला देश, एकरूप भारत, जगापासून वेगळा.

हा आहे हिमालय गिरिराज. पर्वतांचा हा राजा, पश्चिमेकडून पूर्वेकडे दीड हजार मैल लांब, अडीचशे मैल रुंद. समुद्रापासून समुद्रापर्यंत पसरलेला. याची शिखरं आकाशाचे चुंबन घेतात, ढगांमध्ये हरवून जातात. धुराप्रमाणे उठणारे ढग याच्या शिखराच्या चोहोबाजूंना घिरट्या घालतात, जणू त्याचे पागोटे असावे. असंख्य शिखरं, त्याच्या अखंड शृंखला, देश-रक्षणासाठी जणू जागता पहारा देत उभ्या आहेत.

हिमालयाच्या पलीकडे दुसरेच जग आहे. वादळा-तुफानाचे जग, बर्फाचे जग, जेथे बर्फाचे तुफान चालते, थंड-तीक्ष्ण हवा हाडाहाडांना कंपायमान करते, त्याच बर्फाला, त्याच बर्फाच्या तुफानाला, त्याच थंड तीक्ष्ण हवेला हिमालय आमच्यासाठी सहन करतो, आपल्या निधड्या छातीचा कोट करून आम्हाला त्या हिम-प्रहारापासून वाचवतो.



आणि जर का हिमालय नसता—एके काळी तेथे हिमालय नव्हता, समुद्र हेलकावत असे—तर आम्हीही न राहातो, पाणी भरून आणणाऱ्या या आमच्या नद्या पण नसत्या, आमच्या गंगा—यमुना नसत्या, आमची हिरवी शेतं नसती, खेडी नसती. फक्त असती बर्फाने झांकलेली जमीन व त्यावर सारखे घोघावणारे झोंबरे वादळ—वारे व पसरलेले ओसाड. न झाडं असती, न पक्षी, न आंबे, न कोकिळा, न फुलं, न लता, न फुलपाखरं, न भ्रमर !

जगातील एक महाकवि कालिदासाने या पर्वतराज हिमालयाचा महिमा गाइला आहे. तो आपल्यासाठी निव्वळ डोंगर नाही, ज्याची

ऐशी शिखरं जगांतील सर्वांत उंच पर्वतांहूनही उंच आहेत. नाही. तो फक्त दगडांचा ढीग नाही, रुक्ष पहाड नाही, तोही माणूसच आहे. आमच्यासारखाच माणूस. आणि माणूस म्हणूनच आमच्या जीवनात आम्ही त्याला ओळखलं आहे. आमची वेद–पुराणं, आमची गीतं–गोष्टी त्याच्याच वर्णनांनी भरल्या आहेत.


नाही, तो दगड नाही; तो माणूस आहे. कालिदासाने तर त्या हिमालयावर एक खंडकाव्य लिहिलं आहे. कुमारसंभव त्याचं नाव. त्यात हिमालयाचे मनुष्यरूपाने दर्शन घडते. हिमालय गृहस्थ आहे. बायका-मुलं असलेला गृहस्थ. मेना त्याची पत्नी; पार्वती त्याची मुलगी; शंकर त्याचा जांवई. फार प्रेमळ कुटुंब आहे त्याचं. त्याचीच व जांवई शिव–पार्वती आमच्या लग्नाच्या गाण्यातूनच आळवली जातात. आमच्या आया व बहिणी शिवासारखा वर व पार्वतीसारखी वधू मागतात. आणि हा आमच्या वाईट गोष्टींना गिळून जाणारा, भांग–धोत्रा खाणारा नीळकंठ, विष पिऊन अमृत देणारा औघडदानी भोलानाथ तिथेच तर राहातो; हिमालयात कैलासात.

देवतांचे निवासस्थान आहे हिमालय. देव, गंधर्व, विद्याधर, किन्नर जे कोणी माणसापेक्षा श्रेष्ठतर असे जीव आहेत त्यांचे घर माणसाने हिमालयाच्या उंचीवर मानले. तेथे, हिमालयाच्या शिखरांवर ते राहतात. देवतांचे स्वर्गस्थान तेच; सोन्याचा सुमेरु पर्वत तेथेच; यक्षांची अल-कापुरी तीच; शिवाचा कैलास तेथेच, गंधमादन तेथेच, मानससरोवर तेथेच. तेथेच काश्मिराच्या कळसमाथ्यावर कराकोरम पर्वताच्या हिमालय–




पर्वतमालेत अमरनाथ आहे, शिवलिंगासारख्या बर्फाच्या राशी, ज्या कधीच विरघळत नाहीत, शिवाप्रमाणे ज्या अमर आहेत. बद्रीनाथ, केदारनाथदेखील त्याच हिमालयावर; ऋषिकेश, हरिद्वार; सर्व काही.

चार हजार फुटांवर त्या पर्वतराजावर देवदारांची जंगलं सापडतात. हत्तीचे कळप त्यांच्या शाखांवर आपले गाल खाजवितात, तेव्हा त्या फांद्यांतून जे दूध गळते त्यामुळे साऱ्या जंगलात त्याचा वास दरवळतो. हिमालयाच्या क्षेत्रात चित्तळ-हरिणं चरतात, कस्तुरीमृग जिथे बसतात तेथील खडक सुवासिक होतात. आणखी वर तिबेटाच्या वाटेवर ध्रुवकेदार



शेपटांच्या गाई आपल्या पुच्छांच्या चवऱ्या हालवीत हिंडतात. यांच्या पुच्छकेशाच्या राजांसाठी चवऱ्या तयार करतात.

आता जरा या हिमालयाच्या टेकड्यांबरोबर पश्चिमेकडून पूर्वेकडे चलू या. काश्मिराचे मस्तक काराकोरमच्या टेकड्यांनी झाकलेले, हिमालयाच्या पश्चिमेकडे आहे. त्याच्याही पश्चिमेकडे तो हिन्दूकुश पर्वत आहे जो कधी भारताच्या पश्चिमोत्तर सरहद्दीवर होता. त्याच्या किल्ले-कोटाचे पहारेकरी तिकडून येणाऱ्या शत्रूंशी लढत. काराकोरमच्या



पलीकडे पामीर पठार आहे, एक पर्वत-श्रेणी, जेथून कैक पर्वतश्रेणी निरनिराळ्या दिशेने जातात. पामीर जगाची गच्ची मानली जाते. ही पक्की दगडी गच्ची आहे. नेहेमी बर्फाने झाकलेली. त्याच्या कडेला आमू नदी उत्तरपश्चिमेकडून खाली वाहते, मैदानातून उतरून ती सुंदर दऱ्याखोऱ्या निर्माण करते, जेथे केशर फुलते व जेथे जगांतील अनेक जातींनी संस्कृतीच्या वेली लावल्या — आर्य, ग्रीक, शक, इराणी, तिथेच बदख्शां व फरगना आहेत जेथून तैमूरने आपले साम्राज्य उभारले आणि जेथे अनेक लढाया जिंकून बाबराने हिंदूकुश पर्वत ओलांडून काबूल आणि नंतर भारतात आपले राज्य निर्मिले.

पण ती हिमालयापलीकडील गोष्ट आहे. काराकोरमच्या अल्याड सिंधु नदी आहे, जी काश्मिराच्या आंबाड्यावर माळेप्रमाणे शोभते व तेथून पंजाब (आता पाकिस्तान) च्या मैदानात उतरते. सिंधु — जिच्या

प्रवाहाने शौर्याच्या व धैर्याच्या अगणित घटना पाहिल्या आहेत, ज्याच्या किनाऱ्यावर वीरांनी आपल्या वीर्याने व साहसाने कीर्तीचे कोट उभारले.

आता पूर्व-उत्तर दिशेकडे चला. हिमालयाची धवल माला भारताच्या मस्तकावरून म्हणजे काश्मिरावरून उतरत तिच्या पसरलेल्या भुजेवर बंगालकडे गेली आहे. पुढे हिमालयाची ती उंच भूमी आहे जेथून पंजाबच्या पाच नद्या, पाच धारा निघतात: झेलम, चिनाब, रावी, ब्यास व सतलज. सिंधु सुद्धा. त्यांचे स्रोत येथेच. आणि इथूनच ब्रह्मपुत्र निघतो. तिबेटाच्या मधून भारताची उत्तर-पूर्व सीमा बनून आसामाच्या पहाडावरून मैदानावर उतरतो. यमुना व गंगादेखील हिमालयाच्या बर्फाच्या ढिगासारख्या जम्नोत्री व गंगोत्रीतून निघतात व त्या बारीक धारा पुढे वाहात वाहात मैदानातून जाऊन समुद्राचे रूप धारण करतात. देशाला हिरवंगार करतात पण जेव्हा वाटेल तेव्हा पूरही घडवितात.

कैलासाच्या छायेत मानससरोवर आहे, गोड्या पाण्याचे तळे. त्यात सोन्याची कमळं उमलत नसली तरी आमच्या परंपरेने त्याच्या पाण्याला कमलवनाने झांकलेले मानले आहे. कवि म्हणतात की पावसाळ्याच्या आरंभी कमळाच्या मृणालांना तोडून त्यांची न्याहारी करीत करीत राजहंस त्याच मानससरोवराकडे उडून जातात आणि त्याच्या तटावर—तिबेटाच्या सीमेवर—कैलासाचे हिम-शिखर आहे, त्याची प्रदक्षिणा आमचे तीर्थ-यात्री दरवर्षी करतात. कालिदास म्हणतो की हा बर्फाचा पहाड म्हणजे शिवाचा अट्टाहास आहे. गोरा शिव जेव्हा शुभ्र हसतो तेव्हा ते हसू नष्ट होत नाही. एके जागी सांठवत जाते,

आणि तेच गोठून आज कैलास बनले आहे. कवीने त्याच्या चमकदार गुळगुळीत बर्फाच्या भिंतींना देवी व पऱ्यांचे आरसे म्हटले आहे.

आणि दूर पूर्वेकडे, नेपालाच्या उत्तरेकडे एका बाजूला हिमालयाचे सर्वात उंच शिखर एव्हरेस्ट आहे. गौरीशंकर शिखराजवळच २९००२ फूट उंच, ज्यावर कोणत्याही प्राण्याने आजपावेतो आपले पाऊल ठेवले नव्हते; पण माणसाच्या पौरुषाची वाहवा किती करावी की त्याने या शिखरालाही सर केले — भारताचा तेनसिंह व न्यूझीलँडच्या हिलेरीने भारत व न्यूझीलँडचा झेंडा त्यावर रोवला.



हिमालयाची पर्वतमाला आसामपर्यंत गेली आहे. तेथे ब्रह्मदेशाचे डोंगर तिला भेटतात. हिमालयाच्या उतारावरून ज्या नद्या खाली मैदानात वाहतात, त्यांच्या धारांचे तेथे जाळे बनले आहे. त्या प्रवाहातून येणाऱ्या मातीत देशातील अन्न उगवते. त्यांच्याच मदतीने पूर्वी व्यापार चालत असे. त्यांच्याच कांठावर आमची शहरं उभी राहिली. आम्ही त्यांना आपल्या देवी-देवतांच्या स्वरूपाने पुजले. आमचे अन्न-वस्त्र ह्या नद्यांवर अवलंबून आहे.

हिमालयाचे माहात्म्य मोठे आहे. पर्वत म्हटला की त्याच्या उंचीपुढे आम्ही सर्वच लहान वाटतो, आणि त्यात हा तर जगाचा सर्वात मोठा पर्वत. आमच्या ऋषि-मुनींनी पर्वताच्या कंदरातून व वनातून निवास केला आहे. तपश्चर्या केली आहे. आमच्या पांडवांनी संसार जिंकून त्याच हिमालयाची यात्रा केली. त्याच्या सौंदर्याने त्यांना इतके वेडे केले की ते कधीच परतले नाहीत, तेथेच निवाले. आपल्या देशाच्या गरिमेचे सर्वात मोठे रूप हेच हिमालयाचे. त्याला शत-शत प्रणाम.



२

पंजाबाची सीमा आता अमृतसर आहे. शिखांचे पवित्र शहर. या ठिकाणी शीख गुरुंनी सर्व लोकांमध्ये बंधुभावाचा प्रचार केला. मग अत्याचाऱ्यांबरोबर लढण्यासाठी साधूंची सेना निर्मिली. त्याच्याजवळच रावीच्या दोन्ही किनाऱ्यांवर क्षुद्रक व मालव राहात. शूर शेतकरी. त्यांनी राजा आपल्या जमातीत मानला नाही. पंचायत राज्याचाच शिक्का चालवला. याच मालवांनी शिकंदराला तरवारीचे पाणी पाजले. शिकंदर हरला व मेला.

ब्यास नदीच्या दोन्ही बाजूंस द्वाब आहे. येथेच कधी आर्य आले व वसले. सतलज व यमुनेच्या मध्ये सरस्वती व दृषद्वतीच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ५१४५ ... १५
३८३ ... नोंद दि. २९ । ३

धारा वहात असत. सरस्वतीची धारा पानिपत-करनालच्या पसरलेल्या वाळवंटात लोपली. कधी तिच्या काठी मोठी घडामोड चाले. होम-यज्ञांनी तिच्या तीरावरील तसू-तसू जमीन भरली असे. त्याच नांवामुळे आमच्या पूर्वजांनी सरस्वतीला ज्ञानदेवता मानले. तिचा आमच्या पूर्वजावर एवढा उपकार होता, त्यांचा तिच्यावर इतका लोभ होता की जेव्हा पूर्वेकडे गंगा-यमुनेच्या संगमावर त्यांनी वस्ती केली तेव्हा आपल्या यज्ञांचा त्यांनी जल्लोष केला, तेव्हा दोन नद्यांच्या संगमालाच त्रिवेणी नाव दिले. तिसरी नदी आपली प्रिय सरस्वती मानली. पण ती प्रकट नव्हती म्हणून तिला 'अंतःसलिला' म्हटले. अशी ही नदी जमिनीखालून वाहते. कुरुक्षेत्राचे पसरलेले प्रसिद्ध मैदान तेथेच आहे, जेथे महाभारताची लढाई घडली. तेथे भगवान कृष्णाने अर्जुनाचा मोहभंग केला व गीतेचा कर्म-मार्ग उपदेशिला. तेथे सरस्वतीच्या काठावर कौरव-पांडव भावांमुळे विरक्त झालेले बलराम आले व बसले.



पृथ्वीराज चव्हाण

जवळ पानिपताचे मैदान आहे – तरावडीचेही – जेथे भारताच्या अनेक खुनी लढाया लढल्या गेल्या. तरावडीत तर पृथ्वीराजाने शहाबुदीनला आपल्या लोखंडाचे पाणी पाजले पण आपल्या भोगविलासामुळे

मित्रांना शत्रू बनवून दुसऱ्यांदा तो लढाईत हरला व सरस्वतीच्या प्रवाहातच त्याची जीवन-नौका बुडाली.

थोड्या अंतरावरच ते ऐतिहासिक मैदान आहे जेथे बाबरने प्रथम दिल्लीच्या जवळ मोर्चाबंदी केली होती. प्रथम तोफा येथेच गरजल्या, प्रथम दारूगोळ्याचा उपयोग येथेच झाला, आतिषबाजीमुळे इब्राहीम लोदीचे हत्ती बावचळले. मग त्याच मैदानात दोनच पिढ्यानंतर हेमूचे नातू अकबर व त्याचे संरक्षक बैरमखाँ यांजकडून मोगली सलतनत हिरावून घेण्याचा प्रयत्न केला होता. त्याच मैदानात अहमदशहा अब्दाली आणि मराठ्यांमध्ये जोराचा संग्राम घडला आणि हिंदुस्थानचा इतिहास बदलला. मोठे माहात्म्य आहे त्या मैदानाचे.

जवळच आहे दिल्ली. महाभारताच्या काळी त्याचे नाव होते इंद्रप्रस्थ. यमुनेकाठी ती आजही उभी आहे तोऱ्याने. आठआठदा ती पडली व उठली. नेहमी तिचे मालक बदलले. तिने नेहमी आपले स्वरूप पालटून टाकले आहे. तिचा भोग करणारे मेले, पण तिचे वैभव कमी झाले नाही. पृथ्वीराज व बलबन, अल्लाउद्दीन व महमद तुघ्लक, बाबर व अकबर, शहाजहाँ व औरंगझेब — एकानंतर एक आले व गेले. दिल्लीचं सौभाग्य अखंड राहिलं.

त्या दिल्लीत हिंदू-मुसलमानांनी खांद्याला खांदा लावून देशाची संस्कृती निर्मिली. तिचे पुढचे टप्पे गाठले. कुतुबमिनार व लाल किल्ला, जुम्मा मस्जिद व मकबरे दोघांच्या कलेची साक्ष. दोघांनी मिळून तेथे




मोगल कलमाची चित्रं काढली, अशी चित्रं जी पाहून जगातील चित्रकार चकित होतात. दोघांनी मिळून त्या उर्दू भाषेला समृद्ध केले, ज्या भाषेची सफाई व साधेपणा ही भूषणं आहेत.

हा पाहा आग्रा. यमुनेच्या काठी. ग्वाल्हेरच्या राजाने येथेच कोहिनूर हुमायूंला दिला, आपल्या कुटुंबाच्या रक्षणासाठी. मग तो स्वतः चितोडकडे गेला. या कोहिनूर हिऱ्याची कथा फार अद्भुत आहे. हा मोठा अनमोल हिरा आहे. तेव्हा जगाच्या दैनिक खर्चाचा अर्धा भाग अशी तेव्हा याची किंमत होती. आज हा अनेक बादशहांजवळ राहून इंग्लंडाच्या राणीच्या मुकुटात जाऊन बसला आहे.

अकबराने याच आग्र्यात स्वतःचा किल्ला बनवला. येथेच त्याची नवरत्नं विक्रमादित्याच्या नवरत्नांसारखी चमकली. येथेच हिन्दू-

मुसलमानांच्या परस्पर प्रेमाचा पहिल्यांदा धडा शिकविण्यात आला. येथेच जगातील सर्वांत अमूल्य, सर्वांत सुन्दर आलेशान इमारत ताजमहाल आहे – जगातील महालांत अपूर्व.

जवळच फत्तेपूर शिक्री आहे, जेथे एके काळी भारताचा भाग्य-निर्णय झाला होता. जेथील हवा आजदेखील रजपूतांच्या दमछाटीने भरली आहे, जेथील जमीन देशभक्तीच्या रक्ताने अजूनही ओली आहे. आकाश त्यांच्या बलिदानापुढे गप्प आहे. बाबराच्या क्षणोक्षणी मारा करणाऱ्या तोफखान्याच्या आगीत सांगाचे राजपूत घोडेस्वार स्वतःला होमून पुढे सरले. एक तुकडी पुढे गेली, तुटली; दुसरी पुढे गेली, तुटली; नंतर तिसरी, चौथी अशा असंख्य तुकड्या एकानंतर एक चाल करून गेल्या. जगाने अशी भयंकर लढाई कधीच पाहिली नव्हती. आणि त्या राजपूतांचा सरदार तो मेवाडचा राणा सांगा होता, ज्याला फक्त एक हात, एक पाय होता व ज्याच्या शरीरावर ऐंशी घाव होते.





राणा सांगा




कीर्ति-स्तंभ

शिक्री महालांचे आगर आहे. जगातील काही अत्यंत सुंदर महाल येथे निर्मिलेले आहेत. अकबराच्या कलावंतांनी कलेचे सौंदर्य या इमारतींवर, त्याच्या खांबा-मेहरापींवर, बुरुजांवर-भिंतींवर ओतले आहे. कुशल चित्रकारांनी तिथं एकाहून एक सुंदर चित्रं काढली आहेत. अकबर तेथे सर्व धर्मांच्या पंडितांचे वाद-विवाद ऐकत असे. तिथेच त्याने आपल्या नव्या दीने-इलाही धर्माचा पाया रोवला; या धर्मात सर्व धर्मांच्या उत्तम गुणांचे सार-सर्वस्व होते.

पण आज ती शिक्री ओसाड व शून्य आहे. पाणी न मिळाल्यामुळे अकबराला शिक्री सोडून द्यावी लागली. आज हे संपूर्ण शहर शेकडो महालांसकट रिकामे पडलेले आहे. जणू काय कुणाच्या तरी शापाने

ते निराधार झाले:आहे. बुलंद दरवाज्यामागे बंद. या दरवाजाहून उंच दरवाजा जगात नाही.



मथुरा. हिंदीत म्हण आहे 'तीन लोकसे न्यारी मथुरा.' जगावेगळी. त्याच यमुनामातेच्या तीरावर. लोणी चोरणाऱ्या कृष्णाची नगरी.



सूर मीरा तुलसी

आणि ते वृंदावन, जेथे बालगोपाल गाई चारायला नेत. सूरदास-मीराबाईचे वृंदावन. गोकुळ, नंदगाव, बरसाना, जेथील धुळीत भगवान कृष्णाच्या पावलांचे ठसे उमटले होते, जेथील गाई कृष्णाचे नाव घेऊन हंबरडा फोडतात, जेथील माता आपल्या मुलांमध्ये नंदलालाचे स्वप्न पाहतात.

आणि तेथेच कृष्ण एके दिवशी कंसाला मारून मथुरा जिंकून जरासंधाच्या हातून युद्धात पराभव पावून दूर पश्चिमेकडे निघून गेले. त्यामुळे त्याचे नावच 'रणछोडलाल' ( युद्ध सोडून पळणारा ) असे पडले. चक्रधारी काय पळपुटा होता ? अरे ज्याने न लढता, व अस्त्र धारण




न करता केवळ बुद्धीने महाभारत जिंकले तो काय रणछोड असू शकतो ? तो तर त्याचा महिमा की पश्चिम समुद्राच्या तीरावर द्वारका वसवायची होती म्हणून तो तिकडे गेला. आणि तो द्वारकेकडे नसता गेला तर आमचे वाङ्मय कसे पूर्ण झाले असते ? श्रीमद्भागवत कसे लिहिले जाते ? गोपींचे कारुण्य कसे ओसंडते ?



त्याच मथुरेत दोन हजार वर्षांपूर्वी कुषाणांनी राज्य केले, तेव्हा कलेच्या एकेकाहून सरस अशा मूर्ती तयार झाल्या. गुहांच्या काळातील बुद्धमूर्तींना तर कुठलीच तोड नाही.


गंगेचे खोरे, ज्योत, यमुना, शरयू, गंडक वाहते, देशाची वखार आहे. अन्नधान्यांनी भरलेले खळे. मीरत-देहरादून ते आसामपर्यंत.



या जमिनीत कोठेही एकही खडक नाही की दगडगोटा नाही, मऊ माती, ज्यात बीं पडले की अंकुर फुटतात. ही राम–कृष्णाची भूमि आहे, वाल्मीकि–व्यास, अशोक–विक्रमादित्य, शेरशहा–अकबराची ही भूमि आहे. राजकारण व तत्त्वज्ञान, ज्ञान व विज्ञान, कला व साहित्य, धर्म व प्रेमाच्या दृष्टीने या मध्यदेशातील नेतेजनांनी देशाचे मार्गदर्शन केले. चिनी प्रवासी हुएन-त्सांगने लिहिले आहे की, येथील राहणारे देवांची वाणी बोलतात. बोलतात तर त्यांच्या ओठातून अमृत झरते, मधाचा वर्षाव होतो. त्यांची बोली सर्व देशात प्रमाणभूत मानली जाते. जे ते बोलतात तेच खरे आहे, जे ते सोडून देतात, तेच खोटे. सद्व्यवहाराचे ते स्वरूप आहेत, मर्यादेचे मालक.

साऱ्या उत्तर-भारताची मुख्य शहरं याच गंगा-यमुनेच्या खोऱ्यात आहेत. मीरत, प्राचीन काळातील हस्तिनापुर, कनौज, कौशाम्बी, प्रयाग, काशी, अयोध्या, पटना, गया आणि आजची व्यापार-केन्द्रं कानपुर, आसनसोल, कलकत्तासुद्धा. मध्यदेश फार वैभवशाली आहे.

बरेली जिल्ह्यात रामनगर आहे. जुनं अहिछत्रा, जिथं पांचालांचा राजा द्रुपद राज्य करीत असे. पांडव व कौरवांचे गुरु द्रोणाचार्य याच राजाचे गुरु-बंधू. खूप कमालीचे बाण चालविणारे धनुर्धर. तेथील पांडवांची राणी होती द्रौपदी. त्याच द्रुपदराजाची मुलगी, जिनं आपल्या अपमानाचा बदला कौरवांचा सत्यानाश करून घेतला आणि पूर्व म्हणजे कम्पिला, प्राचीन काम्पिल्य, पूर्वी पांचालाची राजधानी. हा




गंगे-यमुनेमधला द्वाब ( फरुखाबाद जिल्हा ) पांचाल म्हणवत असे. तेथील राजा प्रवहण जैबलीने उपनिषदांचे ज्ञान शोधले.

कनौज कुणाला नाही माहीत? एकानंतर एक अनेक राजकुलांनी येथे राज्य केले: मौखरि, हर्ष, आयुध, प्रतिहार, गहडवाल. महंमूद गझनवीच्या हल्ल्यामुळे प्रथम प्रतिहार गेले, शहाबुद्दीनच्या हल्ल्याने मग गहडवाल. या गहडवालात शेवटचा होता जयचंद. त्याच्यावर फार अन्याय झाला आहे. असे सांगण्यात येते की त्याने देश दुष्मानाच्या हातीं सोपविला. खरी गोष्ट अशी आहे की जेथे


पृथ्वीराज पळतांना सरस्वती नदीकाठी पकडला गेला व ठार करण्यात आला, तेव्हा ऐंशी वर्षांचा जयचंद आपल्या मूठभर जवानांबरोबर दुष्मनाशी लढतांना धारातीर्थी पडला.

यमुनाकाठी अलाहाबादच्या जिल्ह्यात कोसम गावात दूर–दूरवर जुन्या कोटाच्या भिंती व पडक्या इमारती सापडतात. महाभारतानंतर गंगेच्या पुरामुळे हस्तिनापूर वाहून गेल्यानंतर याच भग्न इमारतींच्या जागी अर्जुनाच्या कुळातील राजांनी राजधानी कौशाम्बी वसवली. तेथील राजा उदयन, बुद्धाच्या वेळी राज्य करीत असे. त्याच्या कथा या देशातील खेड्यातून सांगितल्या जात.




गंगा-यमुनेचा संगम तीर्थराज म्हणवतो. सरस्वती नदीच्या काठी जेव्हा आर्य पूर्वेकडे पुढे जाऊ लागले, तेव्हा त्यांनी याच प्रयागात मुक्काम केला. त्यांच्या यज्ञयागांमुळेच या जागेचे नाव प्रयाग ठेवण्यात आले. आता त्याला अलाहाबाद म्हणतात. येथेच यमुना, दिल्ली, आग्रा, मथुरा व कौशाम्बीचे ऐतिहासिक व पवित्र रज गंगेत टाकते आणि गंगा ती रज घेऊन मंदगतीने सागरापर्यंत पोचवून देते. मोठे माहात्म्य आहे त्या प्रयागाचे, त्या रजाचे व गंगेच्या धारेचे.

ज्या काशीत स्नानासाठी सर्व देश पळत जातो, ती प्रयागापासून फार लांब नाही. थोडी पूर्वेकडे समजा. ही शंकराची पुरी, पावन नगरी, बाबा विश्वनाथाची आहे. गंगेची धारा येथे वळून गेली आहे आणि ही नगरी पाण्यापर्यंत वसत गेली. मोठी शोभा आहे येथील



गंगेची व तिच्या तिरावरील पवित्र नगरीची. एकेकाहून मोठाले महात्मा, एकाहून एक पंडित येथे आले व ज्ञानगंगेत स्नान करून तृप्त झाले. येथील राजा अजातशत्रूने जनक-विदेहाप्रमाणे उपनिषदाचे ज्ञान उच्चारले, येथे जैनांच्या आदिगुरु सुपार्श्वाने जैनधर्माचा ज्ञानविचार केला, या काशी-जवळच सारनाथमध्ये भगवान बुद्धाने आपला प्रथम उपदेश दिला. येथे स्वामी शंकराचार्याला मंडनमिश्राच्या पत्नीने शास्त्रार्थात हरविले. सारनाथमध्ये अशोकाने आपला स्तंभ उभा केला होता. त्या स्तंभाच्या मस्तकावर जे सिंह होते तेच आज आमच्या राष्ट्रीय सरकारचा शिक्का म्हणून आहेत.



उत्तरेकडे शरयूचे खोरे आहे. शरयूचे जल मोठे पावन. रामाची अयोध्या या नदीच्या काठी होती. हिच्याच धारेत रामाने कधी स्नान केले व शेवटी याच प्रवाहात ते सामावले. नंतर अवधाची राजधानी गोंडा व बहराइच जिल्ह्याच्या सरहद्दीवर सावत्थी ( श्रावस्ती ) बनली, ज्याचे भग्नावशेष सहट–महट गावाच्या मातीखाली दबलेले आहेत. बुद्धाने येथे अनेकदा चातुर्मास वर्षावास केला.

अवध प्रांताची अलीकडील राजधानी होती लखनौ. ती आजही उत्तर–प्रदेशाची राजधानी आहे. नबाबांनी त्या शहरात महाल व बगीचे पसरून दिले. तेथील दरबारात मुगलांनी

चालवलेला आमचा राष्ट्रीय वेश – कुर्त्ता, अचकन, पायजामा खूपच शानने चालला. त्यांच्या बेगमांजवळ अपार दौलत होती. त्या फैझाबादजवळ राहात असत. त्यांना इंग्रजांनी बेअब्रू करून कंगाल बनविले.

उत्तर – पूर्वेकडे नेपालच्या 'तराई'त कपिलवस्तु वसलेले असे, जेथे साक्यांचे पंचायती राज्य असे. भगवान बुद्ध याच साक्यात जन्मले. यांच्याजवळच दक्षिण–पूर्वेला अनेक पंचायती राज्य होते. कोलिय, मोरिय, मल्ल इत्यादींचे. आणि पूर्वेकडे याच पंचायती राज्यांची मालिका बिहारमध्ये मुझफ्फरपुरपर्यंत पसरली होती. मल्लांच्या मध्यभागी कसिया-मध्ये भगवान बुद्धाने आपले शरीर सोडले, थोड्या अंतरावर पावामध्ये जैनांच्या महात्मा महाविराने.



भगवान् बुद्ध

मुझफ्फरपुरच्या बसाढ गावी वैशालीचे भग्नावशेष आहेत. तेथील वेश्या अम्बापालीने बुद्धाच्या सेवेत तेथील राजांना लाजविले. तेथे लिच्छवी, वज्जी, विदेह आदींचे संमिश्र असे बुद्धकालीन पंचायती राज्य होते. याच वैशालीचे महात्मा होते महावीर. जवळच ती मिथिला आहे, जेथील जगज्जननी होती सीता. राजा जनकाची पुत्री.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
२९
वि............
नोंद दि............



भगवान् महावीर

येथेच नंतर जनक विदेह झाले, ज्यांनी उपनिषदांचा ज्ञानोच्चार केला. उपनिषदाचे अनेक ऋषि त्यांच्याच दरबारात असत. याज्ञवल्क्य मुनी तेथेच राहात असत. तो दरबार ज्ञानाचा अखाडा बनला. ज्ञानी गार्गीने तेथे याज्ञवल्क्याला एकदा आव्हान दिले होते. तेथील राजकुलाला उध्वस्त करून तेथील जनतेने नंतर आपले पंचायती राज्य कायम केले. पण या पंचायती राज्यांना नंतर मगध साम्राज्याच्या वाढत्या सीमांनी गिळंकृत केले. उदाहरणार्थ कोसल (अवध) साक्य मल्लांनी खाल्ले.

गंगेपलीकडे आहे मगध. त्याची जुनी राजधानी गिरिव्रज. तेथील राजा जरासंधाने आपल्या जावयाचा (कंसाचा) वध करून कृष्णावर बदला घेण्यासाठी चाल केली. कृष्ण तेव्हा द्वारकेला गेले आणि नंतर भीमाने जरासंधाचा वध केला. बुद्धाच्या काळी राजा बिंबिसाराने त्या राजधानी-बाहेर राजगृहात आपली राजधानी बनवली. त्याचे नगरकोट आजही राजगिरी पर्वतावर दूरदूरपर्यंत पसरले आहेत. नंतर उदायीने गंगा व सोन नद्यांच्या काठी प्रसिद्ध पाटलिपुत्र वसविले व तेथे मगधाची नवी राजधानी कायम केली. हळूहळू मगध साऱ्या भारताचा स्वामी बनला. शिकंदराच्या सैन्याने या मगधाला भिऊन व्यास नदीकाठी



हत्यारं टाकली होती. नंतर यामुळेच राजा चंद्रगुप्ताने ग्रीक राजा सेल्यूकसकडून जिंकून काबुलपर्यंत मगधाची सीमा वाढविली. जगात बंधुभावाचा प्रथम प्रचार करणारा, युद्ध-विरोधी, शांति-प्रचारक राजा अशोक याच चंद्रगुप्ताचा नातू. त्याने वैऱ्याचा बदला मैत्रीने घेतला, वाईटाला चांगुलपणाने जिंकले आणि ज्या युनानी राजांच्या पूर्वजांनी भारतावर आक्रमण केले होते, त्यांच्या राज्यात त्याने औषधं वाटली, माणसांसाठी व इतर प्राण्यांसाठी चिकित्सालयं बांधली. त्याच पाटलिपुत्रात मनूने आपले धर्मशास्त्र लिहिले, पाणिनि-पतंजलीने आपले व्याकरण, चाणक्याने कूटनीतीने भरलेले आपले अर्थशास्त्र रचले आणि येथेच शिखांचे गुरु गोविंदसिंह जन्मले. हेच पाटलीपुत्र आजचे पाटणा.

त्याच मगधात राजगिरी डोंगरामागे गयेजवळ ते गाव उसबेला होते, जेथे पिंपळाखाली भगवान बुद्धाला ज्ञान मिळाले. त्याच ठिकाणी

त्या ज्ञानाचे दर्शन झाले होते, ज्यांचा बुद्धाच्या शिष्यांनी संपूर्ण एशियात – चीन, तिबेट, मंगोलिया, जपान, कोरिया, ब्रह्मदेश, सयाम, अनाम, जावा, सुमात्रा, बाली, लंका या देशातून प्रचार केला. आजदेखील ती गया याच ज्ञानामुळे बोधगया म्हणवते. येथे भारतातील सर्व हिन्दू आपल्या पितरांचे श्राद्ध करण्यासाठी दरवर्षी जातात.

राजगिरीजवळच नालंदा नावाचे गाव आहे. येथे ज्ञानाची किंमत केली जाई, जिथं जगातलं त्या काळचं सर्वांत मोठं विश्वविद्यालय होतं. तिथं जगातील लांबलांबहून येणाऱ्या देशातील दहा हजार विद्यार्थी शिकत व शंभर पंडित एकदम त्यांना शिकवीत.

याच बिहारात सासाराममध्ये तो शेतकरी सरदार शेरशहा झाला, ज्याने भोजपुरी लोकांचा मोर्चा दिल्लीवर नेला. आणि राजकारणात किसानी राज्य कायम केले. त्यानेच अकबराला टोडरमल दिला, आजचा रुपया त्यानेच सुरू केला, जमीन मोजण्याची साखळी दिली, टपालखाते व सडका सुरू केल्या. त्याने आखलेली सडक पाटण्याहून पेशावरपर्यंत गेली आहे. आज तीच सडक ग्रँड ट्रंक रोड म्हणविते. याच रस्त्याच्या कडेला उत्तरप्रदेश व पंजाबातील मोठाली शहरं वसली आहेत.

पुढे आहे बंगाल. त्याची राजधानी कलकत्ता, भारतातील सर्वांत मोठे शहर. 'पूरब देश बंगाला'ची भीती पश्चिमेकडील सर्व स्त्रियांना नेहमी लागलेली असे. त्या बंगाल हा देश जादू-टोण्याचा मानत. आजही त्यांच्या गीतातून असा इशारा असतो की पतींनी सावध असावे की

त्या पूर्वदेशाकडे त्यांनी जाऊ नये, नाहीतर बंगाली 'जादूगरीण बुद्धि नष्ट करील व बोकड बनवून टाकील.

जितकं पूर्वकडे जावं तितकं जादूचं भय वाढत जातं. त्या जादूचा गड आसाम मानला जाई. ब्रह्मपुत्राच्या काठावर वसलेल्या गौहाटीत कामरू-कमच्छा मंदिर आहे. गौहाटीस जुन्या काळी प्राग्ज्योतिष म्हणत. किती सुंदर आहे हे नाव. म्हणजे येथे प्रकाशाचे किरण प्रथम उमलतात, सूर्य प्रथम उदयास येतो, सकाळ प्रथम होते. पूर्व प्रकाशाची दिशा, पश्चिम सूर्यास्ताची, प्रकाश बुडण्याची, अंधाराची.

गंगेचे खोरे हिमालयाच्या पायथ्यापासून बंगालच्या आखाता-पर्यंत शेतांनी हिरवेंचार भरलेले. जीवन तेथे झुलतं, अवर्षणाचं नाव नको. यामुळेच येथील नद्यांच्या काठी पवित्र तीर्थ बनले. मोठीमोठी राज्ये उभारली गेली, गहनाहून गहन ज्ञानाची साधना झाली, शांतीचे संदेश दिले गेले. धन्य आहे ही मध्यदेशाची माती!

दिल्लीच्या पश्चिमेकडे पंजाबहून मालवा व गुजराथपर्यंत पसरलेलं राजस्थान आहे, वाळवंट, सपाट मैदान. बहादुरीचं निधान हे राजस्थान, शूर राजपुतांचा किल्ला. स्वतःच्या शब्दासाठी काहीही करण्याची संवय येथील शेतकऱ्यांमध्ये भिनलेली. शब्दासाठी प्राण देणाऱ्यांची येथे गणना करता येणार नाही. भारताचे शौर्य जणू तेथे ठाण मांडून, किल्ला बनवून वसलेले. साहस व वीरश्रीचे चमत्कार राजस्थानाच्या इतिहासात कुणीही पाहावे. राजस्थानाची इंच इंच जमीन



बलिदानांमुळे आजही ओली आहे; त्याच्या कणा-कणातून हुतात्म्याचे साद येतात. तेथील हवेत वीर राजपुतांच्या हुंकारांचे पडसाद ऐकू येतात; तेथील दिशांमध्ये राजपूत वीरांगनांच्या गौरवगाथा सामावत नाहीत. राजस्थानमध्ये गंगा नाही, यमुना नाही, सोनेरी शेत नाही, फक्त चमचम वाळू आहे. पण तलवारीचा धनी राजपूत तेथे राहतो. तेथेच त्याची राजपुताणी लोखंडाची धार चुंबणाऱ्या संततीस जन्म देते. आम्ही त्याच्या तरवारीची, त्याच्या दुधाची शपथ घेतो.

दिल्ली, आग्र्याच्या सुल्तनतींची लाज याच राजपुतांनी राखली. प्रथम त्यांनीच त्यांचे झंडे उचलले. नंतर त्यांची तिरडी उचलली. अंबरचे कछवाहा, जोधपुर–बिकानेरचे राठोड, बुंदीचे हाडा. सांभर-अजमेरच्या चौहानांनी तर एकदा दिल्ली हिसकूनही घेतली होती. अजमेरच्या त्या बीमलदेवाचा नातू पृथ्वीराज याने दिल्ली ते लाहोर राज्य केले, ज्याने नर्मदेच्या जंगलात हत्तींची शिकार केली. सरहिन्दच्या मैदानात दुश्मनांची शिकार केली. जर त्यांनी विलासाची कांस धरली नसती तर बरे झाले असते.

राजपूतांची तरवार दक्षिणेकडे चमकली; काबुल-बदखशां, बलख-बुखारा, फरगण्याकडे सुद्धा. त्यांचे वाऱ्याहून तेज दौडणारे घोडेस्वार नद्या न पहाड ओलांडून, तोफांच्या ज्वलज्जहाल माऱ्याची तोंडं आपल्या निधड्या छातीने बंद करून पुढे गेले. बाबराने आपल्या रोजनिशीत लिहिले—" तुर्कांचे तुलुगम पाहिले, उझबेकांचे हल्ले पाहिले, पठाणांचे मोर्चे पाहिले, पण या राजपुतांची वीरश्री अशी की मरणाला देखील भीति वाटावी, यांच्या घोडेस्वारांच्या टापांनी जमीन हादरावी."


राजपुतान्याची तसू-तसू जमीन इतिहासाचं तीर्थ आहे. कीर्तीची कहाणी जी न शारदा वर्णू शकेल, न गणेश लिहू शकणार, न व्यास समजणार. ती राजपुतानी होती, जोधपुरच्या राठोडांची राणी जिने धर्मातच्या मैदानात, शिप्रातटाहून पळालेल्या आपल्या पती राजा जसवंत-सिंहासमोर किल्ल्याचे दरवाजे बंद केले. तीच दुर्गादासाच्या तलवारीच्या छायेत, आपल्या पुत्र अजिताला घेऊन, काबुल ते जोधपुरच्या सीमे-पर्यंत, औरंगझेबाची कुमक चिरत गेली. तो राजपूतच होता. बुंदीचा छत्रसाल, ज्याने शाहजहां व जहानआराला दिलेल्या वचनासाठी दाराच्या राज्यासाठी औरंगझेब व मुरादच्या दख्खनच्या सैन्यांमध्ये सामूगडच्या मैदानात शाहाजाद्याभोंवती बर्च्यांची कनात उभारली. ज्याच्या राजपूती प्रहारांमुळे पळणाऱ्या सेनेमध्ये मुरादने भावाला सांगितले—'भाईजान! या दिवाण्या हाडासमोरून पळून जा.' पण त्याच्या शौर्याने चमकून औरंगझेबाने आपल्या हत्तीच्या पायात लोखंडाचे साखळदंड ठोकले व म्हटले, 'सामूगडचे मैदान कर्बला बनेल आणि तेथेच राजपुतांनी कुर्बानी दिली व हसन-हुसैनचे पद जिंकले.

जोधपुरची जुनी राजधानी होती मन्दौर, गुर्जर-प्रतिहारांचे मन्दौर, ज्यांनी एके 'काळी एकीकडे गुजराथ, दुसरीकडे मालवा व तिसरीकडे कन्नौजवर स्वारी केली होती. एकीकडे पालांशी, दुसरीकडे राष्ट्रकूटांशी जे लढले व शेवटी पाटलीपुत्राहून पळालेल्या लक्ष्मीच्या कन्नौज नगरात आपले ध्वज रोविले होते, ज्यांनी प्रयाग व काशीत अश्वमेध केले व आपली विरुदं गायला लावली.


दक्षिण-पश्चिमेकडे आहे अजमेर, अरावलीचा कोट, ज्याच्या आडून अकबर, शाहजहाँ व औरंगझेबाने शेकडो वर्षं मेवाडवर आघात केले. अजमेर शेकडो वर्षं मेवाडचे अंकित राहिले. तेथेच जवळ आहे आबू, ज्याच्या हवन-कुंडातून राजपुतांचे अग्नि-कुल जन्मले होते—चौहान, परमार, परिहार—जिथे वीरांची जात बदलून क्षत्रिय बनविण्यात आली होती.

जवळच दिलवाड्याचे जैन-मंदिर आहे. मोठे मंदिर, संगमरवराचे बनलेले खूप उंच मंदिर. त्याच्या एकेका खांबावर शंभर तऱ्हेचे नक्षीकाम आहे. वर छतावर हजार-हजारो तऱ्हेचे छेनीचे कुसरकाम. जो शिल्पकार पाहील तो आश्चर्यचकित होईल. कधी हे सिरोही राज्यात होते. सिरोही तलवारीने कधी रक्ताने आपले सुयश लिहिले होते. गुजराथ ते दिल्ली व दिल्ली ते गुजराथ जाणाऱ्या सेनांची वाट अडवली होती.

पूर्व-दिल्लीच्या वाटेत—जुन्या अंबरजवळच जयपुर आहे. कोटा-बुंदीच्या थोड्या उत्तरेकडे, आपल्या एकसारख्या घरांची मालिका,



पहाडांच्या घेऱ्याजवळ, जयसिंहाच्या कीर्तीचे पवाडे गात, सूर्य-चंद्राची गति मापणाऱ्या मान-मंदिरासकट. कोटा-बुंदीची राज्यं मेवाडच्या वाटेवर पडत असत. दोन्ही एकाच राजकुलाचे होते. मेवाडचे हाडावत ज्यांनी कितीतरी शताब्दींपर्यंत राणांची आघाडी संभाळली होती.



अजमेरहून एक वाट मालव्याकडे जाते, जेथील जमीन सोने पिकविते, रात्री अमृताचा वर्षाव करतात. त्याच वाटेत एक मुक्काम आहे, स्वर्गाहून कमनीय, काशी-प्रयागहून मंगल, गंगा-यमुनेच्या प्रवाहाहूनही पवित्र, सतीच्या प्रेमाहूनही गंभीर, चितोड.

मेवाडाच्या भालावरील टिळा, वीरश्रीची शपथ, 'देशप्रेमाचा ध्रुवतारा, जौहराची ज्वाला.

मेवाड जोधपूर-बिकानेरप्रमाणे वाळवंट नाही. माळव्याचा जणू तुकडा, हिरवागार, शेतांचे धान्यागार. अरावलीची पर्वतमाला कुठे कुठे तुटलेली आहे; किर्र रानांनी झाकलेली, जेथे वाघ डोंगराच्या कड्याकपारींवर उड्या मारत असत आणि येथेच वाघापेक्षाही जास्त रक्तपिपासु, वाघाहूनही जास्त साहसी माणूस हिंडत असे. शब्दाचा धनी, सिसोदिया.

गुहिल, बापारावल, कुंभा, खुमान, हम्मीर, सांगा आणि प्रतापाची जमीन आहे ही! त्यांच्याच शब्दाप्रमाणे अटळ, त्यांच्याच आठवणींनी निनादलेली आणि त्याच मेवाडच्या एकाकी डोंगर सुळक्यावर मुकुटाप्रमाणे चितोड आहे. ज्या चितोडावर हजारों वार झाले पण त्याने मस्तक वांकविले नाही, तो मात्र नष्ट झाला.

तीन-तीनदा त्याला जमीनदोस्त केले, तीन-तीनदा चितोड उभे राहिले. आणि आज त्याच्या तुटक्या भिंती, त्याचे मोडके कळस-कंगोरे जणूं ओरडून सांगतात: "येणाऱ्यांनो, वांका. हा चितोड आहे, सांगा व प्रतापचा, मीरा व कृष्णकुमारीचा, चूडावत-सक्तावतांचा चितोड."

प्राचीनकाळी याला माध्यमिक नगरी म्हणत. कारण हिच्याजवळूनच मगधावर हल्ला करणारे हूण व म्लेच्छ सैन्य येथून गेले होते. तेव्हा चितोड येथे नव्हते, रिकामे डोंगर होते, त्यावर डरकाळ्या फोडणारे वाघ होते. जर तेव्हाही चितोड असते तर! तर हुणांचे सैन्य यशो-

धर्म्यांशी लढण्यासाठी माळव्याकडे जाते, अजमेरच्या वाटेने मेवाड-पर्यंत पोचेपर्यंतच सर झाले असते.

अल्लाउद्दीनच्या सैन्याने चितोडला वेढा दिला तेव्हा येथील राजा भीमसेनाला कपटाने कैदेत टाकले; तेव्हा चितोडने प्रथम स्वतःला नष्ट करण्याचा जणू विडाच उचलला. पद्मिनीने हजारो राजपुतान्यां-




बरोबर चितेत प्रवेश केला. त्या चितेची राख ऋषि-मुनींच्या मंत्राहूनही कितीतरी अधिक पवित्र होती. हिमालयाहून अधिक उंच. दुसऱ्यांदा अकबराच्या वेढ्यात पडलेल्या चितोडने असे काही बलिदान केले की त्याच्या गौरवगाथा अजूनही गाइल्या जातात. जगमलाच्या रक्ताने जो

दगड आजही तेथे लाल आहे, त्या मेडतिया वीराची कहाणी कधी सोन्याच्या अक्षरांनी लिहिली जाईल. त्याच लढाईत कैलवाचा वह चूडावत, वीरपत्ता लढला होता, ज्याची अमर कहाणी मेवाडच्या चारणांना तितकीच आवडते जितकी अकबराच्या सैन्याला ती आश्चर्य-विषय बनून राहिली. आणि सोळा वर्षांच्या त्या लहान मुलाची आई त्याच्याहूनही जास्त शूर निघाली. तिला वाटलं की मुलगा भिऊन तिच्या दुधाला न लाजवो. म्हणून तिने स्वतः कवच घातले. सुनेला, पत्त्याच्या पत्नीला, कवच घातले आणि केशरी वस्त्रं पेहरून मुलाच्या सैन्याच्या तुकडीच्या पुढे ती गेली. तिघे लढले—आई, पत्नी, केलवाचा तो चुडावत बालक पत्ता. या दोन लढायांच्या मध्ये चितोडला नष्ट करणारी ती लढाई लढली गेली, ज्यात गुजराथ व माळवा दोघांचे सैन्य सामील होते. मेवाडच्या राणीने तेव्हा हुमायूंला राखी पाठवली होती व हुमायूं देखील बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, आग्रा ओलांडून राजपुतान्याची वाळू उडवीत मेवाडला पोचला होता. पण तोवर चितोडच्या भिंती आपल्या पहाडी अधारात हरवल्या होत्या.



चितोडाच्या अवशेषांमध्ये जो उंच स्तंभ आहे, आकाश-चुंबी, तो राणा कुंभाने उभारला होता. गुजराथ व माळव्याच्या सुलतानांना एकसाथ हरवून,





विजयाचे स्मारक म्हणून. राणा संगाने आपल्या आजोबांची कीर्ती उज्ज्वल केली, 'जेव्हा दिल्लीचे लोदी व पंजाबच्या राजांना धूळ चारीत त्याने माळवा ते पंजाब व गुजराथ ते कालपी असे त्या काळचे सर्वांत मोठे साम्राज्य स्थापले.


पण मेवाडचा महिमा, चितोडाची उंची, त्यांच्या कुंभा व सांगाच्या तरवारींनी रचली गेली नाही, तेथील स्मारक विजयस्तंभामुळे किंवा महालांच्या कळसांमुळे नाही. ते वैभव प्रतापच्या त्यागाच्या आधारावर उभारले आहे, ज्याच्या बलिदानाने मेवाडची हवा भरली आहे, ज्याच्या सहनशक्तीचे प्रमाण म्हणजे घनदाट अरण्यातून झाडांवर गाडलेले



महाराणा प्रताप

ते लोखंडाचे खिळे आहेत, ज्यावर प्रतापसिंहाच्या मुलांचे पाळणे टांगले जात असत. त्या प्रतापसिंहाचे कोरडे जेवण पाच-पाचदा उचलून टाकावे लागे कारण शत्रू त्याला जेवण्याचा मोकाच देत नसत. मेवाडच्या त्या वीरतेचा व त्यागाचा प्रतीक प्रतापसिंह आहे, ज्याने पाव शताब्दीपावेतो माणसाच्या स्वातंत्र्याचे स्तोत्र गाइले व देशाच्या दुष्मनासमोर मस्तक वांकविले नाही.

आणि पश्चिमेकडे काठियावाडपर्यंत गुजराथ पसरले आहे. त्याच्याही पश्चिमेकडे काठियावाड लागून आहे, ज्याच्या पश्चिमेकडे द्वारका आहे, भारताची अंतिम नगरी, जेथे मथुरा सोडल्यावर कृष्णाने शरण घेतले. जी कृष्णाने वसविली. तेथूनच कृष्णाचे मित्र उद्धव ब्रज-



भूमीत गेले. तेथील गोपी सुख-शृंगार कृष्णाच्या प्रवासामुळे विसरून गेल्या होत्या. पण उद्धवाच्या संदेशामुळे गोपींच्या मनांचे औदासीन्य कमी झाले काय ? आमच्या संपूर्ण साहित्यावर त्या उदासीनतेचे सावट पडत गेले. सुदामाच्या बगलेतील तांदूळ, त्याच द्वारकेच्या द्वारापर्यंत

पायांत काही न घालता पळत जाऊन विश्वंभर कृष्णाने खाल्ले होते; त्याच द्वारकेत जेथे हजारो वर्षं पश्चिमेकडच्या देशातून येणारे जहाज धनाचा वर्षाव करीत होते.

काठियावाडाने आम्हांला दयानंद व गांधी दिले. दयानंदाने अंधकारावर प्रकाशाची दुंदुभी वाजविली. दंभस्फोट केला. गांधींनी आमचा जन्मसिद्ध अधिकार स्वराज्य आम्हांला दिला. आजची राष्ट्रीय भावना, या देशाचे झोपेतून जागे होणे, सर्व त्याच महात्म्याच्या नेतृत्वाचा परिणाम. दयानंद व गांधी दोघांचे विचार काठियावाड व गुजराथच्या पलीकडे गेले. गांधींच्या विचारांनी तर सर्व जगाला प्रभावित केले. दोघांची भाषा गुजराथी होती पण दोघानी हिन्दीचे महत्त्व ओळखले व राष्ट्रवाणीच्या रूपानें तिला त्यांनी नमस्कार केला.


महात्मा गांधी

गुजराथ आणि काठियावाड 'पश्चिमी व्यापाराची बाजारपेठ बनली. पश्चिमी समुद्रतटावर उतरणारा माल गुजराथमार्गेच दिल्ली, आग्रा व माळव्यात जाई. नर्मदा व ताप्ती नद्यांनी आणलेल्या मातीमुळे गुजराथची शेतं धान्याच्या राशी पिकवितात. त्याच्या पूर्वेकडील जमीन काळ्या मातीने झाकली आहे. त्यात कपाशी पिकते. तेथील कपाशी-

मुळेच एकेकाळी इंग्लंडातील कपड्याचे कारखाने चालू राहिले. आता त्यांच्यामुळेच बडोदें, अमदाबाद व मुंबईच्या कापड-गिरण्या चालतात.

त्याच गुजराथच्या भूमीवर प्रथम युरोपातील परदेशी लोकांनी – इंग्रज, डच व पुर्तगाली लोकांनी – वसाहती केल्या. आपल्या इमारती व



कंपन्या उभारल्या. सुरतेत इंग्रजांनी आपल्या बाजारपेठा व कारखाने काढले. सुरत थेट गुजराथ आहे म्हणतात. सुरतेच्या मूर्ती ज्यांनी पाहिल्या नाही त्यांनी काय पाहिले? दिल्लीचे बादशहा मध्यप्रदेशावर कब्जा केल्यानंतर प्रथम गुजराथ व माळव्यावरच अधिकार करणे पसंत करीत. गुजराथच्या मार्गाने देश-विदेशाचा व्यापार हाती येत असे, माळव्याच्या द्वारा देशाची धान्यागारं.


फार प्राचीन कालापासून गुजराथ व काठियावाड महत्त्वाचे प्रांत मानले जात. कारण त्याच वाटेने बहुतेक परदेशी हल्ले झाले. ख्रिस्त्रीचे

यवन, सिन्ध-सुण्घचे शक, चीनचे हूण, उत्तर-पश्चिमेकडील गुजर व अहीर अधिकतर त्याच वाटेने देशात आले. गुजराथचे नावच परदेशी गुजरांच्या नावावर ठेवण्यात आले. पण देश–विदेशच काय, पण असा कोणता विचारप्रवाह या देशात आलेला नाही की जो आमच्या समुद्रात आम्ही पचवून टाकला नाही ? आज आमच्यात गुजर, अहीर, शक, यवन सर्व मिसळलेले आहेत. त्यांचे रक्त आमच्या नसांतून वाहात आहे, त्यांची भाषा आमच्या जिव्हेवर नाचत आहे, त्यांची राहाणी आमच्या व्यवहारात उतरलेली आहे. त्यांची कला आमच्या कलेत एकप्राण, एकरूप होऊन मिसळली. तो कसला परिस जो कोणत्याही धातूचा स्पर्श केल्याबरोबर त्याचे सुवर्णमय बनवीत नाही ! आम्ही परिसाप्रमाणे होतो. ज्याला शिवलो, त्याचें सोने केले.

गुजराथ कला, शिल्प, चित्राची भूमी आहे. येथील मंदिरं एकाहून एक विशाल, एकाहून एक सुंदर आहेत. अमदाबादच्या मंदिराचे खांब जसे नाजुकपणाचे नमुने आहेत व तेथील मशिदी तर जणूं हिंदू-मुसलमानांनी राष्ट्रीय सन्मान म्हणून उभ्या केल्या आहेत. दख्खन सोडून असा दुसरा कोणताच प्रांत नाही जेथे हिंदू



व मुसलमान दोघांच्या अक्कलीचा इतका उपयोग इमारती बनविण्यात झाला असेल, जितका गुजराथेत—तेथील मंदिरातून लाकडाचे कामही फारच सुंदर झाले आहे.



गुजराथ आणि काठेवाडची चित्रं प्राचीन व सुंदर आहेत. जैनांच्या निमंत्रणपत्रांवर व पोथ्यांवर गुजराथी कलमेची चित्रं बनत असत आणि त्या कलमेचा प्रभाव प्रसिद्ध राजस्थानी कलमेवरही पडला. त्या देशातील बादशहांनी माळवा, दख्खन, अवध व जौनपुरच्या सुल्तानांप्रमाणे आमच्या इमारतींचे, चित्रांचे व संगीताचे संरक्षण केले. त्यांना संपूर्ण बनविले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे



## ४

मध्यभारत, उत्तर भारत किंवा मध्यप्रदेश आणि दख्खिनच्या मधोमध आहे रीवा – खजुराहोपासून ग्वाल्हेर, भोपाळ, माळव्यापर्यंत. कलेच्या दृष्टीने हा प्रदेश फार समृद्ध आहे. खजुराहीचे मंदिर देशात अपूर्व मानले जाते. त्याचे स्वरूप, आकार, मूर्ती, शिल्परचना सर्व ‘ त्यां सम तें ’ असेच आहे.

झांशी कायद्याच्या हिशेबाने पडते उत्तरप्रदेशात, पण तिचा अधिक संबंध ग्वाल्हेर व मध्यभारताशी आहे. तसा देखील तिचा



नाना फडनीस राणी लक्ष्मीबाई तात्या टोपे

संबंध बुंदेले व चंदेले यांच्याशी जास्त होता. झांशीच्या राणी लक्ष्मीबाईने तर एक शतकापूर्वी स्वातंत्र्य-संग्राम लढला होता. सन सत्तावन-मध्ये तिने इंग्रजांचे पाय या देशातून उखडून टाकले. लढता लढता तिने प्राण दिले.



तानसेन

ग्वाल्हेर भारताच्या संगीतकलेची राज-धानी. म्हणतात की बैजू बावरा काही काळ येथे होता. पण तानसेन तर तेथलाच

राहणारा होता. कछवाहा रजपूतांचा तो गड. तेथील किल्ला अजेय मानला जाई. आज देखील तेथील इमारती जुन्या शैलीचा उत्तम नमुना आहेत. ग्वाल्हेरच्या राज्यातच बाघच्या प्रसिद्ध गुंफा आहेत, जेथे अजिंठ्याच्या चित्राप्रमाणे सुंदर भिंतीवर चित्रं आहेत, जी पाहतच राहावी.

याच ग्वाल्हेरात पदमपवायां आहे. जेथील नाग राजांनी कुषाणांपासून तलवार हिरावून त्यांना देशाबाहेर केले व राष्ट्रीय झेंडा उभारला. ज्यामुळे गुप्त काळासारखा सुवर्णकाळ आमच्या पुढे आला. नाग शिवाचे भक्त होते व आपल्या पाठीवर शिवलिंग धारण करीत असत. जेव्हा जेव्हा ते विदेशी राजे लोकांना हरवीत, तेव्हा काशीत ते अश्वमेध करीत. तेथे गंगाकाठी त्यांनी दहा अश्वमेध केले. त्यामुळे तेथील दशाश्वमेध घाटाचे नावच हे पडले. मिर्झापुर व माळव्याच्या मध्ये ब्राह्मण राजे वाकाटक ग्वाल्हेरचे शेजारी होते.

माळव्याची काळी माती ग्वाल्हेरच्या खडकाळ भूमीचे उत्तर आहे. त्याला लागूनच ती आहे. इतकी सुपीक जमीन जगाच्या पाठीवर कुठे नाही. हवामान फारच सुरेख आहे. संध्याकाळी फार सुखदायक, चांदण्या रात्री मनोहर. प्रथम याचं नाव होतं अवन्ती. मग पंजाबच्या मालवांनी येथे वसून तिला आपलं नाव दिलं. शकांनी देखील येथे राज्य केलं व शकराजा रुद्रदामाने संस्कृत गद्याची सेवा केली, ते समृद्ध केलं. उज्जयिनी प्राचीन काळापासून अवन्ती व माळव्याची राजधानी होती. ज्योतिषाचं केंद्र म्हणून व व्यापाराची मंडी म्हणून ती प्रसिद्ध होती. विक्रमादित्याची नवरत्नं येथलीच. संस्कृतचे महाकवि



कालिदास


कालिदास येथेच राहात होते. येथील राजा यशोधर्म्याने हूणांना परास्त केले. नंतर पठाणांचा त्यावर कब्जा झाला आणि रूपमती व बाझबहादुरचे प्रेम तेथेच वाढले. दोघे कवी होते, दोघे गाणारे. आज माळव्यात घरोघरी त्यांची कहाणी प्रसिद्ध आहे.

राजा मुंज आणि भोजाने माळव्याला यश दिले. त्यांच्या




दानाने देशाचे पंडित व कवि संतृप्त झाले. भोजाने आपली राजधानी उज्जैनहून धारानगरीत आणली. येथे त्याचे संस्कृत कॉलेज देश–विख्यात झाले. जवळच मांडूच्या नबाबांनी मांडूला सरोवरांनी भरले. धारेनंतर मांडू पठाणांची 'राजधानी बनली. बाझबहादुर तेथलाच. मांडू उजाड झाले पण उज्जैन आजही शिप्रातटाकी महाकाळ शिवाच्या छायेत जागृत आहे.

भोपाळच्या नबाबांनी आपल्या इलाख्यांत महाल व सरोवरं भरली. पहाड व जंगलांनी संपूर्ण मध्यभारताला निसर्गाने शोभिवंत केले आहे. पण भोपाळचे सौंदर्य तर अवर्णनीयच. येथूनच जवळ आहे भेलसा, प्राचीन विदिशा. जेथील हस्तिदंताच्या कारागिरांनी सांचीच्या



स्तूपाचा परिसर बनविला. हा भाग जुन्या इमारतींनी भरला आहे. सांची व भरहुतचे स्तूप आजपासून सव्वादोन हजार वर्षांपूर्वीचे अशोककालीन आहेत. त्याच्या रेलिंगांवर मूर्तींची एक सृष्टीच उभी आहे. असं वाटतं की दगड जिवंत आहेत. कलावंत ब्रह्मदेवाप्रमाणे झाला आहे. मध्यभारत कलेचं आकर आहे.



५


भारतभूमी कलेची जननी. हे म्हणताना की अमुक प्रांत कलेचा आकर आहे, मन अडखळतं. कारण की देशाच्या इंच-इंचात कलेचे नमुने लपलेले आहेत. कोणती माती आहे जेथे एकाहून एक सुंदर मूर्ती दबलेल्या नाहीत? कोणती अशी जागा आहे जेथे भारताच्या कलावंतांनी आपली कला साधलेली नाही? बंगाल-मद्रास-मध्यभारताला

लागून असलेल्या उडीसा प्रांताचे कलावैभव या दृष्टीने कमी नाही, फार मोठे आहे.

उडीसाची जंगलं नेहमी हत्तींकरता प्रसिद्ध असत. हुमायूंने एकदा त्या जंगलात हत्तीची शिकार करण्यात कितीतरी महिने घालवले. अजून देखील तेथे घनदाट अरण्यं कमी नाहीत. महानदी व सुवर्ण-रेखेच्या खोऱ्यात धानाची अनंत संपदा उगवते. पण त्याच नद्यातून पूर आला की उडीसाची निम्नभूमि जणू समुद्राने झाकली जाते. सुवर्णरेखेच्या वाळूतून पूर्वी पुष्कळ सोने काढले जाई. आज देखील कैक लोक रेतीतून सोने काढण्यातच आपली उपजीविका चालवितात.

कटक, भुवनेश्वर, पुरी आणि बालासोर उडीसाची प्रमुख नगरं. प्राचीन नगर भुवनेश्वरांत ओडिसा सरकारची नवी राजधानी बनत आहे. भुवनेश्वर मंदिराचे नगर आहे. अधिकांश शिवमंदिरांचं. इतकी सुंदर मंदिरे या देशात फारच थोडी. विशाल रम्य, भिंतींवर मूर्तींचं विश्व. हसणाऱ्या बोलणाऱ्या जिवंतप्राय मूर्ती. कसरी राजांनी बनविलेली ही मंदिरं आहेत.

जवळच कनारक आहे, जेथील सूर्यमंदिर हिंदुस्थानातील एक अद्भुत वास्तु. त्याच्यासारखं दुसरं सूर्यमंदिर भारतात नाही. ग्रहांच्या मूर्ती, घोड्यांची तेजी, चाकांची कलाकुसर सर्व काही जणूं ओतीव मुशीतल्यासारखे. माणूस पाहून आश्चर्यचकित होतो. मंदिर कधीच पूर्ण होऊ शकले नाही, अर्धवटच बनून राहिले. पण आज जे उरलेले आहे, ते तुटलेले असूनही मनुष्याच्या बुद्धी व पौरुषाचे आश्चर्यजनक प्रमाण आहे.



जंगलातून, पर्वतामध्ये खोदलेले खंडगिरी व हाथीगुंफा या गुंफा आहेत. दोन हजार वर्षांपेक्षाही जास्त झाले, त्या पर्वताच्या शिळा खोदून बनविण्यात आल्या. त्यांतील मूर्ती अजूनही सुंदर आहेत. हत्ती-गुंफेत तेव्हाच्या राजा खारवेलाचा एक शिलालेख आहे. त्यावरून समजले की त्याने दोनदा मगधावर हल्ला केला व त्या प्रांताला नामोहरम केले आणि एकदा तर त्याच्या भीतीने पामीराचा युनानी राजा दिमित ( डेमॅट्रियस ) पाटलिपुत्र सोडून पळाला.

पुरी नगरीही प्राचीन आहे व ती काशी, उज्जैन, द्वारका, कांची, मथुरा, हरद्वारप्रमाणे भारताच्या सात पवित्र नगरीतून एक मानली जाते. ती भारताची सर्वांत पूर्वेकडील नगरी व द्वारका पश्चिमेकडील. देशाला आमच्या महात्म्यांनी चार दिशांकडे चार तीर्थांनी कसून टाकले होते. उत्तरेत हिमालयात बद्रीनाथ आहे. दक्षिणेत समुद्रकाठी

रामेश्वरम. पश्चिमेत द्वारका, तशी पूर्वेकडे पुरी. पुरीचे पुराणात मोठे माहात्म्य आहे. कारण तेथे जगन्नाथाचे मंदिर आहे. अयोध्येत जसा रामाचा महिमा, मथुरा-द्वारकेत कृष्णाचा, काशीत शिवाचा तसा पुरीत जगन्नाथाचा महिमा आहे. जगन्नाथ बुद्धस्वरूप आहेत. बुद्धाने सर्व मानवांना समान मानले होते, मनुष्यां-मनुष्यांत भेदभाव नव्हता केला. हिंदूंच्या जातिभेदावर जोराचा हल्ला केला होता. त्यामुळेच जगन्नाथाच्या देवळातही जातिभेद नाही. ब्राह्मण व भंगी मंदिराच्या अंगणात एका पंक्तीत जेऊ शकतात, जेवतात. कुणी स्पृश्यास्पृश्य भेद मानत नाहीत.

पुरीचा समुद्र-किनारा फार सुंदर आहे. वाळूचं मैदान दूर दूर-पावेतो पसरलेले. नेहमी निळ्या समुद्राच्या फेसाळत्या लाटा आपटतात. शिंपल्या, शंख, कौड्या विखरत राहातात. जवळच नारळ व ताडांचे दाट जंगल आहे, ज्यामुळे समुद्रकाठ श्यामल वाटतो. याच तटावर कधी दूरदूरची पूर्वपश्चिमेची जहाजं परदेशातून येत. आता या काठावरील पाणी जास्त गहिरं नाही व फक्त मासे मारण्याच्या कामापुरता हा समुद्रकाठ आहे.

दक्षिण-ओडिसालगतच आंध्रदेश आहे, जो आतापर्यंत मद्रासचा भाग मानला जात असे, ज्याप्रमाणे ओडिसा बिहारचा. त्याच्याही दक्षिणेकडे मद्रास आहे, कुमारी अंतद्वीप व रामेश्वरम् पावेतो. आंध्र लोक अधिकांश गोदावरी व कृष्णा नद्यांच्या खोऱ्यातून राहतात. याच खोऱ्यातून कधी आंध्रांचे साम्राज्य पसरले होते, समुद्राहून समुद्रापर्यंत. बहुतेक संपूर्ण दख्खनपावेतो. त्याचे राजा सिसुकाने उत्तर भारताच्या मगधापर्यंत आपले साम्राज्य वाढविले होते. त्यांच्या राजांचे अनेक लेख गोदावरी तटाकी नाशिकाच्या गुंफांतून अजूनही वाचावयाला सापडतात. त्यांची शक्ति शकांनी व महाराष्ट्राच्या अहीरांनी तोडली. त्यांच्या साम्राज्याच्या काही भागावर विजयनगराचे साम्राज्य मग उभे राहिले.

आंध्र देशालगतच दख्खन आहे; ज्यात हैद्राबादही सामील आहे. दख्खन मध्यभारताच्या दक्षिणेकडे, निर्मदा-तापीच्या दक्षिणेकडे आहे. विंध्याचल व सातपुड्याच्या पर्वतमालिका देशाला उत्तर व दक्षिण अशा दोन मोठाल्या खंडात विभाजित करतात. विंध्याचलालाही आमच्या पूर्वजांनी जिवंत मानले होते. पुराणातून लिहिलं आहे की अगस्त्यमुनी दक्षिणेकडे आले. पण पूर्वी दक्षिणेकडे जाणं सोपं नव्हतं. कारण विंध्याचल दिवसेंदिवस उंचावतच चालला. पण तो अगस्त्यमुनींचा शिष्य होता, त्यामुळे ते जेव्हा तिकडे निघाले तेव्हा त्याने प्रणाम करण्यासाठी मस्तक वांकविले. त्यावर मुनींने म्हटले की जोवर आम्ही

परत येत नाही तोवर असा रहा. अगस्त्य परतलेच नाही, व विंध्याचल तसाच साष्टांग पडला आहे.

दख्खनेकडील जमीन बहुतेक दगडाळ आणि त्याच्या पूर्व-पश्चिम दोन्हीकडे पूर्वी व पश्चिमी घाटाच्या रांगा दक्षिण समुद्रापर्यंत गेलेल्या. याच्या पश्चिमी भागातील सह्याद्रि पर्वतात अजिंठा व एलोराच्या गुंफा आहेत. अजिंठ्याच्या लेण्यांत अधिकतर भिंतीवर चित्रं आहेत. एलोराच्या गुंफांत जास्त करून मूर्ती-अजिंठ्याच्या गुफांमध्ये कधी बौद्ध साधू राहात असत.-त्यांच्याच उपदेशासाठी त्यात त्यांच्या धर्माची सुंदर



चित्रं काढली आहेत. एलोऱ्यात कैलासमंदिर शिवाचे आहे, ते मोठे विशाल आहे. दगडाचा पहाड तीस लक्ष हात कोरून हे मंदिर बनविले आहे.

दक्षिणेकडे अशा गुंफांची खूपच संख्या आहे : कार्लें, कान्हेरी, भाजेंच्या गुंफा देशभरात सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहेत. मुंबईजवळच समुद्रात एलिफंटा गुंफा आहे, ज्यांत ब्रह्मा, विष्णु, महेशाची त्रिमूर्ती आहे.




पूर्वेकडे महाराष्ट्र आहे, वीर मराठ्यांचा देश. या मराठ्या शेतकऱ्यांना शिवाजीने संघटित करून एक राष्ट्र बनविले. यांच्या शौर्याने यांचे स्वातंत्र्य हिरावणाऱ्या मोगलांना चांगलेच पाणी पाजले. एकदा तर मराठे सगळ्या देशाचा कर वसूल करीत व दिल्ली-लाहोर-राजस्थानवरही त्यांनी अधिकार केला होता. पानिपतच्या मैदानात त्यांची शक्ती लुटली. मुंबई भारताचे सर्वांत मोठे बंदर आहे. देशात कलकत्त्यानंतर दुसऱ्या नंबरचे शहर. कदाचित सर्वांत श्रीमंत, मिल-गिरण्यांनी भरलेली. थोड्या अंतरावर पेशव्यांचे नगर पुणें आहे.



शिवाजी


आंध्रदेश व दख्खनच्या दक्षिणेकडे आहे मद्रास-प्रदेश, जो पूर्वी समुद्रकाठापासून थेट कन्या-कुमारीपर्यंत गेला आहे. हा तामिळ भाषा बोलणाऱ्यांचा देश आहे. त्याच्या दक्षिण-पूर्व टोकावर रामेश्वर आहे. जेथे धनुष्कोटीच्या बंदरापासून लंकेकडे रोज जहाजे जातात आणि कोलम्बो येथे थोड्याच तासांत पोचता येते.



या प्रदेशात पर्वत कोरून, विशेषतः विटा-दगडाच्या मंदिरांची विपुल संख्या आहे. मोठी विशाल मंदिरं आहेत. येथे दक्षिण व उत्तरे-कडील मंदिरांमध्ये मोठे अंतर आहे. दख्खनच्या मंदिराच्या चौबाजूंना

मोठाली अंगणं आणि त्यांत तलाव होते. बाहेरच्या भिंतीतून मोठाली फाटकं असतात ज्यांना गोपुरम म्हणतात. या भागावर पूर्वी पांड्यांचे व पल्लवांचे राज्य होते. त्यांनीच ही विशाल मंदिरं बनवली. तंजावरचे बृहदेश्वर शिवाचे मंदिर हिंदुस्थानात अजोड आहे. रामेश्वरममध्येही अनेक देवळं आहेत, पण तेथील महत्त्व तेथील खांबांच्या खूप लांबी-पावेतो बनविलेल्या मंडपासाठी आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय
अनुक्रम ........ वि
क्रमांक ........ नोंद दि ........




मैसूर पूर्वी स्वतंत्र संस्थान होते. तेथेही अनेक मोठाली मंदिरं होती. त्यांचा अधिकांश भाग पहिले विजयनगर साम्राज्यात असे. विजयनगरच्या महालांचे व मंदिरांचे अवशेष हैदराबादच्या दक्षिणेकडे

हम्पीत आजही उभे आहेत. मैसूरच्या हळेबीड आणि वेलूरच्या मंदिराची गणना तर आश्चर्यकारक इमारतीत आहे.

हा सगळा दक्षिण मोठा सुपीक आहे. कावेरी नदीच्या खोऱ्यात खूप धान होते. नद्यांमुळे कालवेही खूप मिळतात आणि त्यांचे पाणी पाट-बंधाऱ्यांनी वापरास घेतात. मैसूरच्या टिपू सुलतानाची इंग्रजांशी खूप लढाई होत असे. जोवर तो जिवंत होता त्याने स्वातंत्र्य हिरावणाऱ्यांशी वैर चालू ठेवले. मैसूरच्या जंगलात हत्तींचे कळप हिंडत असतात. तेथे त्यांची शिकार करण्याच्या जागाही आहेत. कावेरीच्या स्रोतापासून मोती काढले जातात. या मोत्यांची इटालीतील रोम नगरात फार मागणी असे. या मोत्यांच्या ऐवजी युरोपातून पुष्कळ सोने या देशात येत असे.

दक्षिण भारताचे पश्चिमी टोक मलबार म्हणवते. त्याचं जुनं नाव आहे केरळ. प्राचीन वाङ्मयात केरळीयांच्या रूपाचे मोठे गुणवर्णन आढळते. त्यांचे मोकळे केस आजही त्या स्त्रिया उभ्या असतां जमिनीवर लोळतात इतके लांबसडक असतात.

मलबारात चंदनाची जंगलं आहेत व त्या जंगलातून दालचिनी, मिरी, लवंग, तेजपत्री वगैरे गरम मसालेही तेथे होतात. भाज्यांतून गरम मसाला घालणे जगाला मलबारनेच शिकवले. या गरम मसाल्याचा युरोप व मलबारमध्ये कधी मोठा व्यापार चालत असे आणि एकदा या मसाल्यानेच त्या रोम महानगराची प्रतिष्ठा राखिली. पाचव्या शतकात जेव्हा अलारिकने रोम जिंकले तेव्हा त्या रोम शहराच्या सुटकेसाठी त्याने रोमपासून तेतीस मण गरम मसाले घेतले. जर



रोमच्या बंदरात गरम मसाल्यांनी भरलेली भारतीय जहाजं नसती, जर रोमच्या दुकानातून व तेथील निवासियांच्या स्वयंपाकघरातून गरम मसाले नसते तर रोमचे स्त्री–पुरुष अलारिकच्या तलवारीने कापले गेले असते. अनन्त सोने आणि रोमन दिनार या मसाल्यांच्या ऐवजी युरोप व मिस्त्र देशातून भारतात येत असत. मलबारच्या किनाऱ्यावरच प्रथम भारताचा पत्ता लावणाऱ्या वास्को-डि-गामाची जहाजं कालीकट येथे आली.

मलबारच्या दक्षिणी हवेची उत्तर भारताच्या वाङ्मयात मोठी चर्चा आहे. लोकांचा विश्वास आहे की सकाळचे थंड, मंद, सुगंधित वारे मलबारातून उत्तरेकडे येतात व आमच्या शरीराला स्पर्शून त्याची श्रांति दूर करितात.

हा आपला देश आहे, सुवर्ण-भारत. किती सुंदर आहे हा आपला देश. म्हणूनच अथर्ववेदाच्या ऋषींनी याची इतकी स्तुति केली. ऋग्वेदात येथील नद्यांचे मोठे माहात्म्य आहे. पुराणातून या देशातील कोणतेच असे स्थान नाही ज्याला तीर्थ म्हटलेले नाही. ज्या देशातील देव तेहेतीस कोटी आहेत, तेथील कोणती जागा त्यांच्या स्पर्शाने पवित्र झाल्यावाचून राहणार ? जेव्हा आमच्या पूर्वजांचे पहाडा—नद्यांवरही इतके प्रेम होते की त्यांना देव बनवून टाकले तेव्हा या भूमीवर आमचे इतके प्रेम का नसावे ?

या देशातील जनता बहुमुखी असूनही समान आहे. येथील आदर्श समान आहेत, राजनीती समान आहे. सभ्यता व संस्कृती समान आहे. राम-कृष्ण, बुद्ध-महावीरांची ही पावन भारत—वसुंधरा. या भूलोकाचा मोठा महिमा आहे. हिच्या मातीचा एकेक कणनकण हजारो राम-कृष्ण-बुद्ध-महावीरांपेक्षाही महान आहे. आमच्या पूर्वजांनी खरोखरीच म्हटले—‘ जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।’ ‘वन्दे मातरम् !’

• • •